(6) ग्रंथालय

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना 2014-15
प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश
**शासकिय महाविद्यालयांचा विकास**

**जिल्हा नियोजन समिती**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर**
क्र. जिनिस/कार्या-37/जिवायो/का-5/492/2014-15
दिनांक 16 /3/2015

विज्ञान संस्था नागपूर
आवक क्रमांक 1017
दिनांक 17/03/15

वाचा 1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. जिबायो 1007/प्र.क्र.39/का-1444 दि.16/02/2008
2) या कार्यालयाचे आदेश क्र. जिनिस/कार्या-37/जिवायो/का-5/295 /2014-15, दि. : 18 /2/2015
3) संचालक,भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे पत्र क्र.आयएएस/संचालक/173/2013, दि. 22/05/2013.
4) संचालक,भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे पत्र क्र.आयएएस/संचालक/283/2013, दि. 12/08/2013.
5) संचालक,भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे पत्र क्र.आयएएस/संचालक/443/2013, दि. 18/12/2013
6) संचालक,भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे पत्र क्र.आयएएस/संचालक/2015/26, दि. 9/2/2015
7) संचालक,भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचें पत्र क्र.आयएएस/संचालक/2014/260, दि. 15/9/2014
8) संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांचे वनाशाकवसविसं/संचालक/645/15, दिनांक 21/1/2015
9) संचालक, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर यांचे पत्र क्र.विसंना/संचालक/152/15 दिनांक 28/1/2015
10) या कार्यालयाचे पुनर्विनियोजन आदेश क्र. जिनिस/कार्या-37/जिवायो/का-9/318 /2014-15, दि. : 21 /2/2015

---

उपरोक्त शासन निर्णय क्र. 1 नुसार सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाकडील योजना/कामे वगळुन या निधीतील कामांना प्रशासकिय मान्यता देण्याचे व निधी वितरणाचे अधिकार जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, यांना प्रदान केले आहेत.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण 2014-15 अंतर्गत सर्वसाधारण शिक्षण या शिर्षाखाली **शासकिय महाविद्यालयांचा विकास** या योजनेंतर्गत रु.300.00 लक्ष निधी अर्थसंकल्पीत असुन बी.डी.एस. प्रणालीद्वारे प्राप्त आहे. संदर्भातील क्र. 10 चे पुनर्विनियोजन आदेशान्वये पुनर्विनियोजनानंतर अंतिम उपलब्धं तरतुद रु. 400.00 लक्ष असुन त्यापैकी संदर्भातील क्र.2 चे आदेशान्वये **रु.197.17 लक्ष** निधी संबंधित यंत्रणांना वितरीत करण्यात आलेले आहे.

संदर्भ पत्र क्र. 3, 4 , 5, 6 व 7 अन्वये संचालक, भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचेकडुन भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे कडून ग्रंथालयामधे Air cooling system लावण्याकरिता , नविन प्रशासकिय व वस्तीगृहाच्या इमारतीमध्ये वाय-फाय सुविधा व सी.सी.टिव्ही कॅमेरे बसविण्याकरिता, संस्थेच्या नविन प्रशासकिय इमारत व वस्तीगृह इमारतीकरिता 40mm(4cm)व्यासाच्या नविन नळ कनेक्शन करिता तसेच सर्व्हर साठीचे अनुक्रमे रु. 17.14 लक्ष, रु. 11.03 लक्ष , रु.4.79 लक्ष व रु.7.04 लक्ष असे एकुण रु. 40.00 लक्ष चे अंदाजपत्रक प्रशासकिय मान्यता व निधी उपलब्ध करून देणेकरिता प्राप्त झाले आहे.

संदर्भातील क्र. 8 चे पत्रान्वये संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांचेकडून **ग्रंथालयाचे अद्यावतीकरण** या कामाकरिता **रु. 86.51 लक्ष** किमतीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. तसेच संदर्भातील क्र. 9 चे पत्रान्वये संचालक, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर यांचेकडून कन्सट्रक्शन ऑफ न्यु शेड, कन्सट्रक्शन ऑफ बोर वेल अॅन्ड सुम्प वेल या दोन कामांकरिता **रु. 77.53 लक्ष** किमतीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

उपरोक्त शासन निर्णय क्र. 1 च्या अधिन राहुन सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन 2014-15 मध्ये **संचालक**, भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर येथील ग्रंथालयामधे Air cooling system लावण्याकरिता , नविन प्रशासकिय व वस्तीगृहाच्या इमारतीमध्ये वाय-फाय सुविधा व सी.सी.टिव्ही कॅमेरे बसविण्याकरिता, संस्थेच्या नविन प्रशासकिय इमारत व वस्तीगृह इमारतीकरिता 40mm(4cm)व्यासाच्या नविन नळ कनेक्शन करिता तसेच सर्व्हर साठीचे अनुक्रमे रु. 17.14 लक्ष, रु. 11.03 लक्ष , रु.4.79 लक्ष व रु.7.04 लक्ष असे एकूण रु. 40.00 लक्ष किमतीचे कामास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत असुन **रु. 40.00 लक्ष,** संचालक, भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन वितरीत करण्यात येत आहे. तसेच संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर, येथील ग्रंथालयाचे अद्यावतीकरण करण्याकरिता **रु. 86.51 लक्ष** किमतीचे कामास या आदेशान्वये खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर निधी हा संगणकिय अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच संचालक, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर येथील कन्सट्रक्शन ऑफ न्यु शेड आणि कन्सट्रक्शन ऑफ बोर वेल अॅन्ड सुम्प वेल या दोन कामांकरिता रु.77.53 लक्ष किमतीचे कामास या आदेशान्वये खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत असून **रु.76:32 लक्ष** निधी हा संगणकिय अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत असून त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

मुळ प्रत मा.जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत

स्वा/-

(अभिषेक कृष्णा)
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, नागपूर.

## विवरणपत्र

(रु. लाखात)

| अ. क्र. | लेखाशिर्ष/ योजनेचे नाव | कार्यान्विती यंत्रणा अधिकारी | अर्थसंकल्पीत तरतुद | पुनर्विनियोजना नंतरची तरतुद | प्रशासकिय मान्यता किंमत | यापुर्वी वितरीत निधी | या आदेशान्वये वितरीत निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शासकिय महाविद्यालयाचा विकास (2202 बी 536) | 1. संचालक, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | 300.00 | 400.00 | 199.78 | 122.25 | 76.32 |
| | | 2. संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | | | 101.43 | 14.92 | 86.51 |
| | | 3. संचालक, भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर. | | | 40.00 | 0.00 | 40.00 |
| | | 4. संचालक, न्याय सहाय्यक विज्ञान संस्था, नागपूर | | | 60.00 | 60.00 | 0.00 |
| | एकुण | | 300.00 | 400.00 | 401.21 | 197.17 | 202.83 |

सदरहू योजनेसंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या निर्णय/नियम/निकष व मार्गदर्शक तत्वे यांचे तंतोतंत पालन करण्याच्या अटी व शर्तीचे राहून निधी वितरीत करण्यात येत आहे.

सदरचा निधी खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

नियोजन विभाग

मागणी क्र. ओ-38

2202 सर्वसाधारण शिक्षण

03 विद्यापिठीय व उच्च शिक्षण

103 शासकिय महाविद्यालये व संस्था

(55) जिल्हा योजना नागपूर

(55)(06) शासकिय कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षण शास्त्र अध्यापक महाविद्यालयाची गुणवत्ता वाढ सुधार कार्यक्रम (2202 बी 536)

27 लहान बांधकामे

**अटी व शर्ती :**

1. योजनेबाबत शासनाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शकसुचना, निकष तपासणी सुची, अटी व शर्तीनुसार योजनांवर/कामांवर खर्च करणे बंधनकारक राहील
2. खर्चाची बाब शासन मान्य असल्याची खात्री केल्यावरच योजनांवर खर्च करावा.
3. सन 2014-15 मधील या योजनेच्या कामावर मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्राप्त निधी चालु वित्तीय वर्षातच खर्च करण्यात यावा.
4. जिल्हा योजनांकरीता वितरीत केलेले अनुदान ज्या योजनेकरीता/प्रयोजना करीता मंजूर करण्यात आले आहे. त्याच योजनेवर/ प्रयोजनांसाठी खर्च करणे बंधनकारक राहील.
5. कामाचे वेगवेगळे पातळीचे छायाचित्र काढुन वेळोवेळी सादर करावे व अभिलेख्यासाठी संग्रहो ठेवावे.
6. सदर काम अथवा कामाचा भाग या कार्यक्रमाव्यतीरीक्त इतर कोणत्याही योजनांतर्गत अथवा योजनेतर कामात अंतर्भुत नाही याची खात्री करूनच कामास सुरूवात करावी.
7. मंजुर केलेल्या बांधकामाचे आकारमान हे प्रशासकिय मंजूरीसाठी नकाशे व सादर केलेल्या अंदाजपत्रका नुसारच कार्यान्वित करावीत त्यामध्ये फेरबदल करता येणार नाही.
8. सदर योजनेसाठी आपल्या प्रशासकिय विभागाने दिलेल्या सुचनानुसार/लेखापद्धतीप्रमाणे या कार्यक्रमांचा हिशेब योजनानिहाय स्वतंत्र ठेवावा.
9. तांत्रिक मंजूरी सक्षम अधिकारी यांनी दिली आहे या अटीवरच प्रशासकिय मान्यता व निधीचे वितरण करण्यात येत आहे.
10. **संदर्भिय शासन क्र. 3 नुसार मार्गदर्शकतत्वचे पालन करावे तसेच गरजेनुसार खरेदी करावयाचे तांत्रिक विनिर्देशानूरुप बाबी निश्चित होउन यथास्थिती निविदेद्वारे स्पर्धात्मक दर प्राप्त करून अथवा मंजुर दरकरारावर अद्यावत वस्तुंची खरेदी करणे आवश्यक आहे.**

D:\order 2014-15\Ias centre.doc

11. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनांच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्ण झाल्याबरोबर काम पुर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादी बाबतची माहिती आपल्या मंत्रालयीन प्रशासकिय विभागास व कार्यालयास सादर करावी. यासंबंधिची जबाबदारी संबंधित प्रशासकिय विभागाची राहील.

12. योजनापुर्ण होण्यास एकापेक्षा अधिक वर्षाचा कालावधी लागणार असल्यास त्यायोजनांच्या पुर्ततेबाबत वेळोवेळी सनिरीक्षणाद्वारे योजना वेळेतच पुर्ण होण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

13. अंपुर्ण कामे पुर्ण करण्यास आवश्यक निधीची पुर्ण तरतुद केल्यानंतरच नविन नविन कामे घेता येईल.

14. मंजुर करण्यात आलेल्या कामांची निविदा प्रक्रिया विहीत मापदंडास अनुसरून इ-टेंडरीग (E-tendering) द्वारे करण्यात यावी.

15. योजना पुर्ण झाल्यावर त्यावर पुनः तरतुद केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

16. कामाची गुणवत्ता राखण्यची जबाबदारी संबंधित कार्यान्विती यंत्रणेची राहील.

**17. योजना राबविण्याची सनियंत्रण व देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची किंवा शासकिय अभिकरणाची राहील.**

18. जिल्हा वार्षिक योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती आणि विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबींसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकिय विभाग जबाबदार राहील.

19. जिल्हा योजनेसंबंधी विधी मंडळास माहिती सादर करणे तसेच विधीमंडळाच्या मागदर्शक सुचनांचे पालन करणे, अर्थसंकल्पिय नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकिय विभागाची राहील.

20. सदर योजनेत समाविष्ट असलेले काम/कामे अन्य कोणत्याही योजनेतुन घेण्यात आलेली नाहीत, याबाबतची खात्री करावी व कामांची द्विरूक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

21. जिल्हा वार्षिक योजनेतुन प्रस्तुत करण्यात आलेली कामे अनधिकृत/बेकायदेशिर/वादातीत अशा जागेवर होणार नाहीत याची दक्षता घ्यावी

22. या योजनेअंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या कामांची नोंद मालमत्ता नोंदवहीत करून त्या कामाचे परीरक्षण करण्याची खबरदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावी.

23. कार्यान्वयीन यंत्रणेने योजनांच्या मासिक खर्चाचे अहवाल दरमहा 5 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

24. अर्थसंकल्पिय तरतुद उपलब्ध झाल्यानंतर व वित्तिय मंजुरी प्राप्त झाल्यावरच कामास सुरूवात करावी दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

25. प्रस्तावित कामांच्या प्रकरणांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

प्रति,
1. संचालक, भारतीय प्रशासकिय सेवा पुर्व प्रशिक्षण संस्था, नागपूर
2. संचालक, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर
3. संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

**प्रत - माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह सादर/अग्रेषित**

1. मा. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
2. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-32
3. मा. संचालक उच्च शिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.
4. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळा, नागपूर
5. संचालक, वसंतराव नाईक शासकिय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर
6. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर
7. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1, नागपूर
8. महालेखापाल महाराष्ट्र-2 नागपूर (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता)
9. वरिष्ठ जिल्हा कोषगार अधिकारी, नागपूर
10. लेखा अधिकारी, जि.नि.स. नागपूर

मुळ प्रत मा.जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, नागपूर करिता.

D:\order 2014-15\Ias centre.doc


BOYS STUDENT